॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड  Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572  **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT**  website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246  E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/८२  दिनांक १०/०७/२०२४

## परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.कार्यक्रम राबविणारी सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: सन २०२२–२३ या वर्षाचे राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविणे बाबत.

संदर्भ: डॉ. निलेश पाठक, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई यांचे जा.क्र. रा.से.यो.–२०२४/प्र.क्र.४९/रासेयो कक्ष, दिनांक १० जुलै २०२४.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये डॉ. निलेश पाठक, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय रौप्य महोत्सवी वर्षापासून महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्याकडून राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबदल विद्यापीठ कार्यक्रम समन्वयक, महाविद्यालय (एकक), कार्यक्रम अधिकारी व स्वंयसेवक यांना दरवर्षी राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतात. त्यानुसार २०२२–२३ या शैक्षणिक वर्षाचे विद्यापीठ/कार्यक्रम समन्वयक/महाविद्यालय/कार्यक्रम अधिकारी/स्वंयसेवक यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये मागील ३ वर्षात सन २०२०–२१ (०१/०४/२०२०) ते सन २०२२–२३ (३१/०३/२०२३) या कालावधीत उत्कृष्ट कार्य केले आहे त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक नियमावलीनुसार राज्यस्तरीय पुरस्कार प्रस्तावापैकी पात्र प्रस्तावाची केंद्र शासनाकडे राष्ट्रीय पुरस्कारासाठी शिफारस केली जाईल असे संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, सोबत जोडण्यात आलेल्या महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या परिपत्रकाचे अवलोकन करून कार्यवाही करण्यात यावी, तसेच सन २०२२–२३ या वर्षासाठीच्या महाविद्यालय/कार्यक्रम अधिकारी/स्वंयसेवक यांचे प्रस्ताव (मराठी व इंग्रजी) प्रत्येकी दोन प्रतीमध्ये विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागात दिनांक १६/०७/२०२४ पर्यंत सादर करावेत तसेच ऑनलाईन प्रस्ताव पाठविण्याबाबतची लिंक (युझर आयडी, पासवर्ड) व वेळापत्रक शासनाकडून प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल.

( अधिक माहितीसाठी: शासनाचे मार्गदर्शक तत्वे व अर्जाचा नमुना जोडण्यात येत आहे.)

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत कार्यवाहीस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.